# शासकीय तंत्रनिकेतन, अंबड.

म्हाडा कॉलनी, पाचोड रोड, अंबड

E-mail : gpambad.dte@gmail.com

## इंटरनेट ऑफ थिंग्सने आता शहरे होतील स्मार्ट सिटी: डॉ. श्रीमती.एस.एस.अर्धापूरकर

अंबड:येथील शासकीय तंत्रनिकेतनच्या अणुविद्यूत विभागाअंतर्गत द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांकरीता " प्रोजेक्ट डेव्हलपमेंट युजिंग ईंटरनेट ऑफ थींग्स "या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अभियांत्रिकी क्षेत्रात सध्या ईंटरनेट ऑफ थींग्स या विषयाचा परिघ खुप वाढत आहे. विद्यार्थ्यांना या क्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञान कसे तयार होत आहे हे कळावे हाच हेतू समोर ठेवून या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

दि.०४/०८/२०१८,शनिवारी आयोजित या व्याख्यानाकरीता एम.आय.टी.औरंगाबाद येथील अणुविद्युत विभागाच्या प्राध्यापिका डॉ. श्रीमती.एस.एस.अर्धापूरकर प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या. या प्रसंगी विस्तृत माहिती देताना डॉ. श्रीमती.एस.एस.अर्धापूरकर यांनी इंटरनेटद्वारे सर्व चल व अचल वस्तू जोडून शहर हे स्मार्ट सिटी होऊ शकते असे सांगितले. जगाच्या कोणत्याही ठिकाणावरून आपण या वस्तूवर नियंत्रण मिळवू शकतो.औद्योगिक तसेच सामाजिक क्षेत्रात काम करत असताना ईंटरनेटचा वापर करून नवनवीन स्वयंचलित तंत्रज्ञान कसे विकसित होत आहे हे त्यांनी आपल्या अनुभवी मार्गदर्शनातून सांगितले. विविध खेळांद्वारे त्यांनी विद्यार्थ्यांना सांघिक कोशल्यांचा अभ्यास करवून घेतला.या संपूर्ण व्याख्यानाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृतीय वर्षे अणुविद्यूत शाखेचे विद्यार्थी चि.स्वप्नील पांढरे व कु.कोमल खापे यांनी केले. या कार्यशाळेकरीता संस्थेचे प्राचार्य डॉ. ए.एम. जिंतुरकर, अणुविद्यूत विभागाचे विभागप्रमुख डि.डि.अहिरराव व उपप्राचार्य डॉ. एस.एस.कानडे यांनी शुभेच्छा दिल्या .





